अपंग व्यक्तींच्या स्वयंरोजगारासाठी
बीज भांडवल योजना

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
मंत्रालय, मुंबई 32.

शासन निर्णय – क्रईडीडी– 1087 / 18863 / 158 / सुधार 2 दिनांक 5 जानेवारी 1989

वाचा – शासन प्रष्ठांकन समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक इडीडी [illegible] 156 / सुधार 2 दिनांक 16 नोव्हेंबर 1988.

शासन निर्णय – अपंगांना सार्वजनिक तथा शासकिय क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध करून देण्याकरिता शासनाकडून सतत प्रयत्न केले जात असले तरी अनेक अपंगांना अद्याप रोजगार उपलब्ध होवू शकला नाही. हा प्रश्न सोडविण्याकरिता उत्तम मार्ग म्हणजे अपंगांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. आणि याबाबत काळजीपुर्वक विचार करून शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, अपंगांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी बीज भांडवल योजना सुरू करावी. या नवीन योजनेला शासनाने मान्यता दिली असून ही योजना जिल्हा उद्योग केंद्रामार्फत सुरू करण्यात येत आहे. योजनेचे स्वरूप व अंमलबजावणी पुढील प्रमाणे करण्यात येईल.

1. [illegible] प्रकल्पावरील खर्च रू. 25,000/- पर्यन्त मर्यादित असावा. मंजूर प्रकल्पा[illegible] एकूण खर्चापैकी 20 टक्के अनुदान बीजभांडवल म्हणून दिले जाईल. अर्थात त्याची मर्यादा रू. 5000/- पर्यन्त असेल.
2. उरलेल्या 80 टक्के खर्चासाठी बँकाकडून लाभार्थ्याला कर्ज मिळवून दिले जाईल.
3. जे प्रकल्प बँकांच्या दृष्टीने योग्य वाटतील अशा प्रकल्पासाठी बीज भांडवल अनुदान दिले जाईल.
4. या योजनेखाली ज्या अपंगांना सहाय केले जाईल ते कोठेही नोकर भरतीमध्ये नसावेत तसेच अपंग लाभार्थी हे 18 ते 40 याच वयोगटातील असावेत. आणि त्यांचे वार्षिक उत्पन्न रू. 6600/- पेक्षा जास्त नसावे.
5. बीज भांडवलासाठी अपंगांना जिल्हा समाज कल्याण अधिकारी व विभागीय समाज कल्याण अधिकारी यांनी सर्वोतोपरी सहाय करावे. आपआपल्या जिल्हयातील अपंग व्यक्तींचे प्रस्ताव एकत्रित करून ते सर्व प्रस्ताव शिफारशीसह जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे पाठवावा.
6. विभागीय समाज कल्याण अधिकारी यांनी संबंधित बँका व जिल्हा उद्योग केंद्र प्रमुखांशी संपर्क साधून अपंगांचे प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर केले जातील याबाबत खात्री करून घ्यावी.
7. संचालक, समाज कल्याण पुणे यांनी या योजनेसाठी लागणारा निधी संबंधित जिल्हा नियोजन केंद्राकडे विभागीय समाज कल्याण अधिकारी मार्फत उपलब्ध करून द्यावा. व प्रत्येक जिल्हयास उददीष्ट ठरवून द्यावे.
8. संचालकांनी ठरवून दिलेली उददीष्टे पुर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी व विभागीय समाज कल्याण अधिकारी यांच्यावर राहील. या योजनेखाली मिळणाऱ्या निधीसाठी करावयाचा प्रस्ताव महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ [illegible] विहित केलेल्या नमुन्यात असावा.
9. मंजूर प्रकल्पांच्या एकूण खर्चापैकी 20 टक्के रक्कम अनुदान बीजभांडवल म्हणून जिल[illegible] उद्योग अधिकारी मंजूर करतील व ती संबंधित बँकांनी मंजूर केलेल्या प्रस्तावानुसार बँकेक[illegible]

GR-20020916155447000-1500

जमा करतील. बीज भांडवल अनुदान व बँक कर्जाची एकत्रित रक्कम बँकाकडून लाभ धारकांना वितरीत केली जाईल.

सदरहू योजना व्यवस्थित अंमलात आणली जाईल आणि त्या खाली प्राप्त झालेल्या प्रस्ताव त्वरित मंजूर होण्याच्या दृष्टीने शिघ्रतेने कार्यवाही करावी.

याबाबत होणारा खर्च 2235– सामाजिक सुरक्षा व कल्याण, 02– समाज कल्याण, 101 – अपंग व्यक्तीचे कल्याण (5) शारिरीकदृष्ट्या अपंगांसाठी इतर योजना, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, पाच – अपंगांना लघु उद्योग सुरु करण्यासाठी बीजभांडवल रुपाने अर्थसहाय मागणी, क्र. एन 6 या शिर्षकाखाली खर्ची घालून या खाली केलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यांवा. या नवीन योजनेवरील 1988.89 मधील खर्चासाठी रु. 11.00 लाख निधी संचालक, समाज कल्याण, म.रा. पुणे यांचेकडे शासन ज्ञापन समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. बीजीटी-–1088/ प्र.क्र. 202/ का– अर्थसंकल्प दिनांक 4 जानेवारी 1988 अन्वये सुपुर्द करण्यात आला आहे.

हा शासन निर्णय नियोजन आणि वित्त विभागाच्या संमतीने वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. [illegible] 867 /व्यय-[illegible] / 11 / दिनांक 3 नोव्हेंबर 1988 अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

[illegible]

सचिव,
महाराष्ट्र शासन [illegible]